# प्रेसनोट

दिनांक:- २९/०३/२०१९

## रस्ता सुरक्षेचे दृष्टीने वाहतूक शाखेतर्फे नागरिकांचे समुपदेशन

पुणे शहराची वाढती लोकसंख्या व त्या पटीने वाढत असलेली वाहनाची संख्या यामुळे पुणे शहरात व आसपास गजबजलेल्या ठिकाणी वाहन अपघातांचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढत आहे. याला एक महत्त्वाचे कारण म्हणजे वाहन चालकांचा बेशिस्त व बेदकारपणा तसेच रस्ते सुरक्षेबाबत अनभिन्नता असने हे होय. पुणे शहरातील व आसपासची वाहतूक व्यवस्था सुरळीत करणेबरोबरच वाहन चालकांना मुख्यत्वेकरुन मोटार सायकलस्वार यांना रस्ता सुरक्षा संदर्भात तसेच स्वयंम: सुरक्षेसंदर्भात विविध तज्ञ व्यक्ती मार्फत समुपदेशन करून त्यांना शिस्त लावणे व वाहन अपघाताचे प्रमाण कमी करण्याचा अभिनव उपक्रम पुणे शहर वाहतूक शाखेचे पोलीस उप आयुक्त यांनी नियमित सुरु केलेला आहे. या उपक्रमाचाच एक भाग म्हणून शुक्रवार दिनांक २९/०३/२०१९ रोजी सकाळी ११.०० ते १३.०० वा. चे दरम्यान रस्ता सुरक्षा संदर्भात वाहन चालकांना समुपदेशन कार्यक्रमाचे ७४ वे सत्राचे आर.एस.पी शेड क्र. ३, पोलीस मुख्यालय शिवाजीनगर येथे आयोजन करण्यात आले होते.

सदर कार्यक्रमास मानसोपचार तज्ञ डॉ. प्रविण पारगांवकर, वाहतूक शाखेचे मपोउपनि. एस. एस. जगताप, सहा. पोलीस उप निरीक्षक फेबियन सॅमसन व सहा. पोलीस फौजदार संजय सोनवणे या मान्यवर वक्त्यांनी वाहन चालकांना मार्गदर्शन केले.

समुपदेशन कार्यक्रमाचे ७४ वे सत्राचे वेळी डॉ. प्रविण पारगांवकर, मानसोपचार तज्ञ यांनी पुणे करांची हेल्मेटबाबत मानसिकता कशी आहे, याबाबत वाहनचालकांचे समुपदेशन करताना संवाद साधला त्यावेळी त्यांनी सांगितले की, दररोज सकाळी नित्यनियमाने तुम्ही काहीतरी कामानिमित्त घराबाहेर पडतात. यावेळी आपल्या मनात प्रत्येक कामाबद्दल सकारात्मक व नकारात्मक विचार सुरु असतात. अशावेळी रस्ता सुरक्षेच्या नियमांचे पालन न केल्यास गंभीर अपघात होण्याची शक्यता असते. त्यातही मनुष्याच्या मेंदू व्यतिरिक्त अन्य भाग ऑपरेशनव्दारे बदलता येवू शकतात परंतू मेंदू बदलता येत नसल्याने सुरक्षेसाठी हेल्मेट वापरणे गरजेचे आहे. त्यांनी पुढे असे सांगितले की, समाजाकडून बदल अपेक्षित करणाऱ्या नागरिकांना प्रथम स्वत:मध्ये बदल व शिस्त आत्मसात करणेची गरज असते. पायाभुत सुविधा उदा. रस्ते, पुल सिग्नल, स्पीड ब्रेकर, झेब्रा क्रॉसींग वाहतूक पोलीस वगैरे मध्ये सुधारणा अपेक्षित आहेतच, परंतू त्यासाठी जो कालावधी लागतो त्या दरम्यान प्रत्येक नागरीकांनी आपल्या सुरक्षेची जबाबदारी काही प्रमाणात स्वत: घेणे अपेक्षीत आहे. मनुष्याचे जीवन हे अमुल्य आहे, त्यांतही मेंदू सारखे नाजूक अवयवास इजा झाल्यास त्यात अद्याप तरी सुधारणा करता येत नाही. त्यामुळे दुचाकी चालवताना हेल्मेट परिधान करणे व मोटर कार चालवताना सिट बेल्ट लावणेची शिस्त अंगी बाळगणे आवश्यक आहे.

मपोउपनि. एस. एस. जगताप, वाहतूक शाखा, पुणे शहर यांनी सदरवेळी सांगितले की, रस्ता सुरक्षेच्या मुख्य घटकांचा उपयोग करून रस्ता सुरक्षा संदर्भात व स्वयंशिस्त संबंधात शिक्षण व समुपदेशन देण्यात येत आहे. त्यांनी पुढे असे सांगितले की, समुपदेशन ही शिक्षा नसुन संधी आहे. वाहन चालवताना हेल्मेट/सिटबेल्ट परिधान करणे ही सक्ती नसून रस्ता सुरक्षेच्या शिस्तीचा भाग आहे. त्यामुळे स्वत:ची सुरक्षा होते त्याचप्रमाणे मा. सर्वोच्च न्यायालयाने सन २०१६ मध्ये पारीत केलेल्या " गुड सॅमरिटन "

कायद्याबाबत माहिती देवून मार्गदर्शन केले. तसेच त्यांनी दैनंदिन जिवनातील छोटया छोटया उदाहरणांव्दारे वाहतूक नियमांचे पालन करण्याची आवश्यकता सांगुन वाहतून नियमांचे पालन न केल्यास आपल्यासह आपल्या कुटुंबाला कोणकोणत्या अडचणींना सामोरे जावे लागते याबाबत माहिती दिली.

समुपदेशन विभागात नेमणुकीस असलेले सहा. पोलीस उप निरीक्षक फेबियन सॅमसन तसेच सहा. पोलीस उप निरीक्षक संजय सोनवणे यांनी हेल्मेट, सीटबेल्ट तसेच वाहतुकीचे नियम व सुरक्षित वाहन चालविण्याचे महत्व याबद्दल वाहनचालकांना मार्गदर्शन केले व वाहन चालवितांना काळजी घेण्याचा व वाहतुकीचे नियम पाळण्याचे आवाहन केले.

सदर कार्यक्रमास महिला, विद्यार्थीवर्ग, व्यापारी व जेष्ठ नागरीक इत्यादी समाजातील सर्व घटकातील नागरीक उपस्थित होते. सदर समुपदेशन कार्यक्रमादरम्यान वाहन चालकांशी संवाद साधून त्यांचा सुध्दा प्रतिसाद समजावून घेण्यात आला.

पुणे शहर वाहतूक शाखेतील २२ विभागामार्फत सध्या रस्ता सुरक्षा संदर्भात वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांवर कारवाई करून त्यांना समुपदेशनासाठी बोलवण्यात येत आहे. या संदर्भात महाराष्ट्र शासनाचे दि. ३१/१२/२०१५ रोजीचे शासन निर्णयाव्दारे वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहन चालकांचे समुपदेशन करण्याचे आदेश निर्गमित केले आहेत.

तसेच सदर समुपदेशन कार्यक्रमामध्ये बजाज अलांयज इन्शुरन्स् ग्रुप, पुणे येथील मार्केटींग हेड श्री. रमणदिप सग्गु यांनी कार्यक्रमा दरम्यान समुपदेशनासाठी आलेल्या वाहन चालकांसाठी रस्ता सुरक्षा संदर्भात प्रश्न मंजुषा कार्यक्रम आयोजित करुन त्यातील विजेत्या ०१ वाहन चालकास मान्यवर वक्त्यांच्या हस्ते हेल्मेटचे वाटप केले.

सदर कार्यक्रमाचे आयोजन व सुत्रसंचालन मपोउपनि. एस. एस. जगताप, वाहतूक शाखा, पुणे शहर यांनी केले. त्यांना सदर कार्यक्रमासाठी वाहतूक शाखेच्या पोलीस उप आयुक्त यांचे मार्गदर्शन लाभले.

दिनांक- ०७/१२/२०१८ पासून आज पर्यंत (दिनांक- २९/०३/२०१९) एकुण ७४ समुपदेशनाचे कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यात आले आहेत. सदर कार्यक्रमात एकुण ४,४१३ वाहनचालक उपस्थित होते. त्यांना योग्य मार्गदर्शन व समुपदेशन करण्यात आले आहे.